# विवेक वर्धिनी विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

पंढरपूर, ता. २१ : विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र विभाग व क्वीक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील स्वप्नाली जाधव व वैष्णवी पाटील या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर सेमिनार आयोजित केला होता. या सेमिनारमध्ये ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती देण्यात आली. यामध्ये आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी कोणालाही सांगू नये, अनोळखी नंबरवर आलेले फोन कॉल्स पडताळणी करून घ्यावेत, व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजवर लिंकची शहानिशा करावी व त्यानंतर पुढील प्रक्रिया करावी, तसेच पासवर्ड स्ट्राँग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी, मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप आदी साधनांवर अधिकृत अँटिव्हायरसचा वापर करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास प्रशालेतील आठवी ते दहावीमधील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. यू. आर. मुंढे, ज्येष्ठ शिक्षक ए. ए. पवार, क्रीडाशिक्षक एम. बी. रणदिवे, बी. एल. सिरसट, आर. एन. मुलाणी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.